दैनिक
सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी २ जून २०२४



# खासगी शिक्षण संस्थांकडून होणारी लूट थांबणार केव्हा ?

जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

शाळेला विद्यामंदिर म्हटले जाते. विद्येचे म्हणजेच साक्षात देवी सरस्वतीचे मंदिर. या ठिकाणी पालक आपल्या पाल्यांना विश्वासाने विद्यार्जनासाठी पाठवतात. पाल्याने शाळेत विद्यार्जन करून चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे आणि आपल्या आई वडिलांचे नाव उज्वल करावे ही सामान्य अपेक्षा पालकांची असते. मागील काही वर्षात मात्र विद्यादानाच्या नावाखाली राज्यात खासगी शिक्षण संस्थांचे पेव फुटले आहे.

विद्यादानाच्या नावाखाली सर्रासपणे शिक्षणाचा व्यापार सुरु आहे. या संस्था प्रतिवर्षी वेगवेगळ्या मार्गाने पालकांच्या खिशावर डल्ला मारण्याचे काम करत असतात. शहरासारख्या ठिकाणी सरकारी शाळेतील शिक्षकांना सरकारकडून अनेकदा शाळाबाह्य कामांसाठी जुंपले जात असल्याने विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी शिक्षकांना पुरेसा वेळ मिळत नाही. याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो. परिणामी सर्व सुबत्ता असूनही सरकारी शाळेतील पट वर्षागणिक खालावतो आहे. हा पट वाढवण्याचे कार्यही दरवर्षी शिक्षकांवरच सोपवले जाते. विद्यार्थी पट पुरेसा नसल्याने शाळेला मोजकेच शिक्षक मिळतात ज्याचा परिणाम पुन्हा आहे त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासावर होतो. त्यामुळे मागील काही वर्षांपासून पालकांचा कल खासगी शाळांकडे अधिक प्रमाणात दिसून येतो.

पाल्याच्या प्रवेशासाठी आलेल्या पालकांना खासगी शिक्षण संस्था नियोजितपणे लुटण्याचे काम करत असतात. शाळेत सर्व सुविधा उपलब्ध असतानाही अनेक खासगी शाळांकडून शालेय सुविधांच्या नावावर पालकांकडून हजारो रुपयांची विनापावती देणगी घेतली जाते. वर्षभरात जेमतेम ८ ते ९ महिने चालणाऱ्या अभ्यासक्रमाकरिताही संपूर्ण वर्षभराची अवास्तव फी आकारली जाते. काही शाळांमध्ये स्टेशनरी, खेळाचे मैदान, सभागृह भाडे, वाचनालय भाडे, संगणक आदी नावाने वेगवेगळ्या फी आकारल्या जातात याखेरीज शालेय बसचे द्यावे लागणारे भाडे वेगळेच. या सर्वांकरिता पैशाची जमवाजमव करताना सामान्य पालकांना घाम फुटतो.

पाल्याच्या उज्वल भवितव्याचा विचार करून अनेक पालक पदरमोड करून आयुष्यभरात जमा केलेली रक्कम पाल्यांच्या शाळाप्रवेशात व्यय करतात तर अनेक पालक कर्ज काढून शाळेच्या फीज भरतात. अनेक खासगी शिक्षण संस्थांच्या शाळांच्या परिसरातच स्टेशनरीचे दुकान थाटलेले असते. विद्यार्थ्यांसाठी लागणारी वह्या-पुस्तके, स्टेशनरी साहित्य त्याच दुकानातून घेणे विद्यार्थ्यांना बंधनकारक केले जाते. शाळेचे गणवेष कोणत्या दुकानातून घ्यायचे हे सुद्धा शाळाच सांगते. केवळ त्याच दुकानात वारेमाप किमतीत संबंधित शाळांचे गणवेश विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आलेले असतात. या गणवेशाची शिलाई अनेकदा तकलादू आणि कापड बऱ्याचदा नित्कृष्ट दर्जाचे असल्याने हे कपडे तीनचार महिन्यांतच फाटतात, परिणामी पुन्हा गणवेश खरेदी करण्यासाठी पालकांना त्याच दुकानात जावे लागते. स्टेशनरीची आणि गणवेशाची दुकाने बऱ्याचदा शिक्षण संस्थाचालकांच्या मालकीची किंवा त्यांच्या नातेवाईकांची असतात, नाहीतर या सर्वांतून शिक्षण संस्था चालकांना कमिशन तरी मिळत असते.

हल्ली अनेक खासगी शाळांमध्ये शाळेच्या वेळेनंतर सायंकाळी शिकवणी वर्ग भरवले जातात. शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्याच शिकवणी वर्गात प्रवेश घेण्यास बंधनकारक केले जाते आणि या शिकवणी वर्गासाठी विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त फी आकारली जाते. याशिवाय वार्षिक स्नेहसंमेलन, खेळ महोत्सव, शैक्षणिक सहल, विज्ञान सहल, वार्षिक सहल या-नात्यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या पालकांना लुबाडण्याचा कारवाया वर्षभर सुरु असतात. विद्यार्थ्यांकडून वेळेत फी न आल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेस बसू न देणे, त्यांची नावे ब्लॅकलिस्टमध्ये घालणे, विद्यार्थ्यांना भरवर्गात अपमानास्पद वागणूक देणे यांसारखे प्रकार या खासगी शाळांतून सर्रासपणे चालतात. प्रत्येक खासगी शाळांनी आपल्या लाभासाठी स्वतंत्र नियम तयार केलेले असतात ज्यावर कोणाचेच बंधन नसते. खासगी शिक्षण संस्था चालवून आजमितीला अनेक जण गडगंज श्रीमंत झाले आहेत.

शिक्षण संस्थांच्या माध्यमातून विद्यादानासारखे महत्कार्य करत असल्याचा देखावा ही मंडळी करत असल्याने यांना समाजातही मान-सन्मान मिळत असतो. ज्यांनी साधी दहावीची परीक्षाही उत्तीर्ण केलेली नाही अशी मंडळीही या शिक्षण संस्थांच्या संचालक मंडळांवर मुख्य पदांवर कार्यरत असतात. राज्याचा शिक्षण विभाग, राजकीय नेते मंडळी




यांच्याशी या शिक्षण संस्था चालकांचे लागेबांधे असल्याने यांच्यावर कारवाईचा बडगा सहसा उगारला जात नाही. शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या पालकांना लुबाडणाऱ्या मध्य प्रदेशातील जबलपूर येथील ११ शाळांवर जिल्हाधिकारी दीपक सक्सेना यांनी नुकतीच कारवाई केली असून विविध फीच्या नावावर या शाळांनी पालकांकडून वसूल केलेली सुमारे ८१.३० कोटी रक्कम त्यांच्याकडून वसूल करून ती पालकांना परत करण्यात आली आहे. शिवाय या शाळांवर २२ लाखांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. याप्रकरणी ५१ जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला असून त्यापैकी २० जणांना अटकही करण्यात आली आहे.

खासगी शाळांकडून केल्या जाणाऱ्या लुटीबाबत पालकांनी सतर्क राहण्याचे आवाहन सक्सेना यांनी केले असून शाळांनी सांगितलेल्या ठराविक दुकानातून पुस्तके, स्टेशनरी अथवा गणवेश खरेदी करण्याबाबत पालकांवर सक्ती करता येणार नाही असेही त्यांनी सांगितले आहे. पालकांना लुटणाऱ्या खासगी शिक्षण संस्था चालकांच्या विरोधात सक्सेना यांनी उघडलेल्या मोहिमेचे सर्वच स्तरांतून कौतुक होत असून सक्सेना यांच्या पावलावर पाऊल ठेवत आजूबाजूच्या अन्य जिल्हाधिकाऱ्यांनीही आता आपापल्या जिल्ह्यात खासगी शाळांविरोधात मोहीम हाती घेतली आहे. राज्य सरकारसुद्धा या मोहिमेस अनुकूल असून या लुटीच्या विरोधात राज्य सरकरकडून लवकरच निर्देश काढले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

खासगी शाळांकडून होणारी लूट ही संपूर्ण देशभराची समस्या असून महाराष्ट्रातही अशा प्रकारची कारवाई राज्यातील सर्व जिल्ह्यांतून करण्यात यावी अशी मागणी राज्यातील नागरिकांकडून केली जात आहे, जेणेकरून खासगी शिक्षण संस्था चालकांवर चाप बसून शिक्षणाच्या नावावर पालकांची होणारी लूट थांबेल. पालिका प्रशासनाच्या आणि सरकारी शाळांमध्ये शासनाकडून मध्यान्ह भोजनासह, गणवेश, वह्या पुस्तके, स्टेशनरी यांसह सर्व सोयी सुविधा विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातात, शिक्षण आणि शालेय उपक्रमांसाठी कोणतीही फी आकारली जात नाही; मात्र शालेय शिक्षकांना अन्य सरकारी कामांसाठी जुंपले जात असल्याने येथील शालेय शिक्षणाचा दर्जा खालावला आहे परिणामी या शाळांमध्ये पाल्याचे नाव घालण्यास पालकवर्ग सहसा तयार होत नाहीत.

खासगी शिक्षण संस्थांची मनमानी रोखायची असेल, तर सरकारी शाळेतील शिक्षणाचा दर्जा सुधारणे, शिक्षकांच्या अडचणी सोडवणे, शाळेतील विद्यार्थ्यांचा पट वाढवणे आदी कामे शिक्षण विभागाला युद्धपातळीवर करावी लागतील. सोबतच खासगी शिक्षण संस्थाचालकांशी लागेबांधे असलेले राज्याच्या शिक्षण विभागातील अधिकारी आणि राजकीय नेतेमंडळी यांचाही शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.

# वाटूळ

परवा माझ्या विराज चव्हाण नावाच्या एका कवी मित्राने लिहीलेला व निर्माण केलेला 'वाटूळ' नावाचा काव्य लघुपट पाहिला आणि मन तब्बल सव्वीस वर्षे मागे गेले. राजापूर जवळील आणि मुंबई गोवा महामार्गावरील तेव्हाचे ते वाटूळ गाव डोळ्यांसमोर उभे राहिले. विराजने आपल्या कवितेतून या गावाचे स्वर्गीय व अद्भुत वर्णन केले आहे. या लघुपटाचे चित्रिकरण तर अगदी अफलातून आहे. याशिवाय सादरीकरणही तितकेच दमदार आहे. मला वाटते, कोकणातील प्रत्येक कवीने असा किमान आपल्या गावावर आधारित एकेक लघुपट काढला ना, जगाच्या नकाशावर कोकणाचे नाव अधिक अधोरेखित झाल्याशिवाय राहणार नाही.

साधारण सन १९९७- ९८ ची गोष्ट असावी. आयुष्यात पहिल्यांदाच मी एम-८० ही स्कुटर विकत घेतली होती. मात्र स्कुटर घेतली तरी ती चालवायला कुणाला येत होती? पण माझा मित्र असलेल्या रावजी खाजणवाडकरने मला स्कुटर चालविण्यासाठीचे प्राथमिक धडे दिले. त्याची तेव्हा बजाज क्लासिक नावाची स्कुटर होती. त्याची बायको राजापूर जवळील रायपाटण गावातल्या प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होती. एकदा आम्ही दोघे दापोलीतून चक्क स्कूटरने रायपाटणला गेलो. तिथे दोन दिवस मुक्काम करून परत दापोलीकडे निघालो तेव्हा रस्त्यात थोड्याफार अंतरासाठी मी त्याची क्लासिक स्कुटर चालवली. मग दापोलीत आल्यावर तो माझी पाठ थोपटत म्हणाला, ' बाबू शिकलास तू आता. एम-८० घेऊन गावी जाऊ शकतोस तू.'

आयुष्यात कधी एखादी नवी सायकल घेऊ शकेन की नाही अशा परिस्थितीत वाढलेल्या मला ती स्कुटर घेतल्यानंतर व ती चालवता येऊ लागल्यावर माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. पुढे गणपतीच्या सुट्टीत मी खरोखर स्कुटर चालवीत गावी जाण्याचा निश्चय केला. माझा रुममेट असलेल्या राधाकृष्ण गुरवला सोबत घेऊन एके दिवशी सकाळी आम्ही दोघे गावाकडे निघालो. राधाकृष्ण गुरवचं घर कुडाळजवळील सोनवडेत. सोबत बाबाला 'सरप्राईज' म्हणून शेजारच्या भाईकडून दोन पांढरेशुभ्र, गुबगुबीत ससे बाबासाठी विकत घेतले होते. त्यांना एका खोक्यात ठेवून तो खोका राधाकृष्ण जपून मांडीवर घेऊन बसला होता. मी नवशिक्या असल्याने मागे बसलेला राधाकृष्ण सारखा घाबरायचा. 'सावकाश चालव, सावकाश चालव.' त्याचा तोंडाचा पट्टा सुरुच होता.




पहिल्यांदाच स्कुटर चालवीत महामार्गाने गावी जाताना फार गंमत वाटत होती. साधारण चिपळूण सोडलं आणि समोरून येणाऱ्या एक दोन एस.टी. बसेसचे बोर्ड वाचून मी बुचकळ्यात पडलो. त्या दिवसांत एस.टी. महामंडळाने मुंबईकर चाकरमान्यांसाठी खास 'गणपती स्पेशल' बसेस सोडल्या होत्या. पहिली बस समोरून आली. तिच्यावरील बोर्ड होता,' मुंबई- सावंतवाडी'. पाठोपाठ दुसरी बस. तिचा बोर्ड,' मुंबई- मालवण'. मला कळेना, अरे, आम्ही तर कणकवली, सावंतवाडीच्या दिशेने चाललोय, तर मग या बस अशा उलट्या दिशेने का चालल्यात? आता नेमके आपण बरोबर दिशेने चाललोय, की बसेसचे बोर्ड उलटे आहेत? मी एका ठिकाणी महामार्गावर बाजूला स्कुटर थांबवली. तितक्यात समोरून आणखी एक बस गेली. तिचाही बोर्ड तसाच,' मुंबई- कुडाळ'. आता मात्र डोकं गरगरायचीच वेळ आली. थांबलो होतो तिथे जवळच एक रिक्षा स्टँड होता. मी चालतच तिथे गेलो. एका रिक्षावाल्याला विचारलं,' साहेब, गोव्याकडे जायचंय तर कुणीकडे जायचं ओ?' तो म्हणाला, असेच सरळ जा. गोवा लांब आहे इथून.' पण मग त्या बसेसचे बोर्ड?' त्यावर तो मंद हसत म्हणाला,' नेहमीचंच आहे ते. पण तुमचा मार्ग बरोबर आहे. जा पुढे सरळ. पुढे मग संगमेश्वर बसस्थानक वगैरे दिसलं आणि जीव भांड्यात पडला. आपण चाललोय तेच बरोबर. त्या बसेसच्या बोर्डचं काही खरं नाही. पुढे हातखंब्याच्या उतारात एका आंब्याच्या झाडाखाली थांबलो. दोघांनीही सोबत घेतलेला डबा उघडला. रस्त्यात थांबून अशी भाजी भाकरी खाताना मजा वाटली. तरी एक बरं होतं, सकाळपासून पाऊस पडला नव्हता. पुढेही तसं पावसाचं चिन्ह दिसत नव्हतं. तसेही दोघांकडे रेनकोट होतेच. फक्त काळजी होती ती सशांची. आम्ही जेवल्यावर काही वेळ सशांना खोक्यातून बाहेर काढून आंब्याखालच्या गवतात सोडलं. दोघेही मस्त कुलकुलीत गवत खाऊ लागले.



लांजा मागे सोडलं तेव्हा गावाकडच्या आठवणी दाटून येऊ लागल्या. तेव्हा आताच्या सारखे अपडेट्स द्यायला मोबाईल फोन वगैरे नव्हतेच. घरी आई वाट बघत असेल. गणपतीसाठी का होईना पण झील गावाक येता म्हणजे आईला कोण आनंद! आता साधारण अडीच तीन तासांत आपण गावाकडे असू याच खुशीत पुढे चाललो होतो. महामार्गावरील वाटूळच्या उतारात आलो आणि 'सूऽऽऽ करीत मोठा आवाज झाला आणि अचानक माझी स्कुटर वळवळली. एकतर मी नुकताच शिकलेला. कशीबशी स्कुटर सावरली. दोघेही, स्कुटरही पडता पडता थोडक्यात वाचलो. बाजूला थांबून पाहिले तर मागचा टायर पंक्चर झालेला. आता आपण धड लांजातही नाही अन धड राजापुरातही नाही. आता काय करायचे? दोघांनाही काही कळेना. मी हातात स्कुटर धरून, राधाकृष्ण सशांचा बॉक्स संभाळीत पायी चालू लागलो. उतार संपल्यावर पुढे एक काच कंपनी होती. तिथेच बाजूला एक नदी होती. तिथेच पुलाजवळ उजव्या बाजूस एक छोटं टपरीवजा हॉटेल दिसलं. कदाचित काच कंपनीतील कामगार तिथेच चहा वगैरे पीत असावेत. आम्ही टपरीजवळ थांबलो. 'जवळ कुठे एखादा टायरवाला आहे का?' विचारलं. टपरीतून एक बाई बाहेर आली.

तितक्यातच अचानक पाऊस सुरु झाला. 'इथून थोडंच पुढे वाटूळ फाट्यावर आहे एक टायरवाला.' ती म्हणाली. राधाकृष्ण म्हणाला, पाऊस थांबेपर्यंत चहा पिऊया. चहा पिऊन झाल्यावर मी स्कुटर मेन स्टॅण्डला उभी केली. खाजणवाडकरने मला टायर कसा काढायचा ते शिकवलं होतं. टुलकीटमधील पाने घेऊन आम्ही दोघांनी टायर काढला. सशांचा बॉक्स हॉटेलवाल्या बाईला विनंती करून तिथेच व्यवस्थित ठेवला. त्या माऊलीनेही सशांवर लक्ष ठेवायचं कबूल केलं. टायर हातात घेऊन दोघेही वाटूळ फाट्याकडे निघालो. साधारण पंधरा ते वीस मिनिटं चालल्यावर फाट्यावर पोहोचलो. आम्ही टायरवाल्याचं दुकान शोधून काढलं खरं, पण टायरवाला

(पान ४ वर)

## साप्ताहिक सदर
# तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

**लेखिकेचा परिचय :**
**चित्रा नानिवडेकर या प्रथितयश लेखिका व संवेदनशील कवयित्री आहेत. समाजात वावरताना आपल्या अवती भवती दिसणाऱ्या, दैनंदिन जीवनात जगताना पावलोपावली संघर्ष करणाऱ्या स्त्रियांच्या कर्तृत्वावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न चित्रा नानिवडेकर आपल्या साप्ताहिक सदरातून करणार आहेत.**

## लग्नबंधन... ? की जंजाळ...!!

आज पुन्हा सुस्मिताचे फेसबुकवर रिल्स पाहिले. बाईसाहेब सध्या व्हिएतनाम फिरताहेत. महिन्यादोनमहिन्यात जगाच्या कोणत्यातरी कोपऱ्यात जात असते. सोशल मीडियावर विस्तृत फोटो, पोस्ट्स, रिल्स टाकत असते.अर्थात आम्हाला त्यामुळे कळतं. नाहीतर आता तिच्यात आणि आमच्यात एक अदृश्य भिंत झाली आहे. त्याचं कारण म्हणजे आम्ही आपापल्या संसारात गळ्यापर्यंत बुडाल्या आहोत. आमच्या नोकऱ्या, मुलांच्या शाळा, प्रोजेक्ट्स, सासुसासऱ्याचं आजारपण, नवऱ्याचं करियर ह्यात सुस्मिता अनमॅरीड असल्याने तिचे आमच्या सर्कल बाहेर असणं आता सर्रास झालं आहे. किंबहुना तीच आता आम्हाला टाळते. कारण ती कधी पार्टीत आली कि कोणीतरी नक्कीच तिला लग्नचा कधी? असा विषय काढलाच जातो.. किंवा "तूला काय कळणार आमचे प्रश्न?"अशा अर्थी बोललं जातं...शिवाय कारण तिचं टकाटक राहणीमान, दिवसागणिक बदलणारी फॅशन. ह्यामध्ये आम्ही आता कोणीच बसत नाही ना...! असो

तर सुस्मिता ही आधुनिक जगातली तरुणी चक्क अविवाहित राहण्याचं ठरवून,आपलं स्वातंत्र्य पुरेपूर उपभोगते.आम्ही चारचौघी जरी तिच्यामागे चर्चा करीत असू तरी तिला आमच्यात ओढण्याचा पुरेपूर प्रयत्न करतो. शेवटी आमचीच मैत्रीण आहे.

एकदा ती पार्कमध्ये गणपती मंदिरात भेटली. मला सुद्धा निवांत वेळ होता. समोर बरीस्ता मध्ये कॉलेज जीवनातल्या आठवणी काढत निवांत गप्पा करत बसलो होतो. मी पण ठरवूनच लग्न हा विषय अज्जीबात बोलण्यात आणला नाही. शेवटी तीच म्हणाली "ईरा..आज मला लग्नाबद्दल टोकलं नाहीस ते?"

मी म्हटलं "कोणीतरी आपलं स्वातंत्र्य एन्जॉय करतंय तर करू द्यावं...खरंतर कधी कधी हेवा वाटतो तुझा. आमच्यात तुझ्या सारखे गट्स नव्हते ग. पण तूला एकटं एकटं नाही वाटत? आमच्या ऑफिसमध्ये मिस शिरीन आहे ना अनमॅरीड ती बऱ्याचदा खूप आक्रस्ताळी वागते. प्रत्येकाला धारेवर धरते...खूप चिडते, आम्ही घरगुती कामासाठी सुट्टी घेतली की तिचा पारा एवढा चढतो..नंतर एकटीच रडते बिडते ग. ऑफिसमध्ये सगळे म्हणतात लग्न केलं नाही म्हणून ती एकलकोण्डी झालीये...मग सुस्मि मला तुझी काळजी वाटते तिला बघितलं की. तूझं रूपांतर मिस शिरीन मध्ये तर नाहीना होणार?

ह्यावर डोळ्यात पाणी येईल एवढं हसत ती म्हणाली

"काहीही हं ईरा ...!अगं असं काही होत नाही.उद्या तूला वेळ असेल तर आमच्या 'सिंगल.. अँड हॅपी'ग्रुपवर ये. तूला ह्याबद्दल खूप माहिती तर मिळेलच शिवाय आमची बाजू समजेल.

खरंच मी तिच्याबरोबर त्या संध्याकाळी गेले. जवळ जवळ 15/16जणींचा ग्रुप आहे त्यांचा. महिन्यातून एकदा भेटतात. त्यात कोणी सोलो ट्रिप करणाऱ्या आपले आपले अनुभव सांगतात.काही ट्रेकिंगला जातात अगदी ट्रायबल एरिया पासून ते हिमालयच्या कडेकपारीत जाऊन आलेल्या आहेत. कोणी चित्रकलेत पारंगत तर कोणी फॅशन शो कंडक्ट करते. आमची सुस्मिता शास्त्रीय संगीत इतकं उत्तम गाते हे मला तिकडे गेल्यावर समजलं.

त्यांच्या ग्रुपमध्ये एक सिनियर सोशल वर्कर आहेत. त्यांच्याशी माझी ओळख करून देत सुस्मिता म्हणाली "बरं का ईरा ह्या आमच्या इन्स्पिरेशन आहेत. शांताताई, त्यांना आम्ही सगळ्या एकट्या का राहतोय हे माहिती आहे. बोल त्यांच्याशी मी जरा इतर मैत्रिणींना भेटून येते."

शांताईंशी बोलताना खूप गोष्टी समजल्या. मनवा एकुलती एक. कायम तिला आईवडील आपल्या लग्नानंतर कसे एकटे राहतील? वडिलांना डायबेटीस, आईला संधिवात कितीही म्हटलं तरी नवऱ्याला आपल्या आईवडिलांना सोडून मनवाच्या घरी राहणं शक्य नाही. ह्या मानसिकतेतून तिने लग्नच न करण्याचा निर्णय घेतला. आता आईबाबांबरोबर खूप वेळ देऊ शकते. आपली नोकरी सांभाळून त्या दोघांबरोबर खूप फिरते. तशी दोन अफेअर्स पण झाली पण कमिटमेन्ट कोणाशीच केली नाही. म्हणून दुःख नाही झालं.

त्या म्हणाल्या काही कारण अशी आहेत.

1.एकटीच राहायची सवय. विशेषतः सिंगल चाईल्ड असलेली.
2.कोणत्याही प्रकरच्या तडजोडीची तयारी नसलेली.
3.लग्न बंधनामुळे कलेला किंवा करियरला येणारी अडकाठी

अशी खूप कारण आहेत.

तिकडून निघताना ईरा विचार करत होती. की ह्यांना म्हातारपणी कसं वाटेल? अर्थात ह्याचं उत्तर सुद्धा पुढे शांताताई देतीलच.



# अध्यात्म

ज्योतिर्विद
उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४



## दहाव्याचा विधि

**व्यक्तीच्या मृत्यूनंतर प्रथम दिवसापासून दहाव्या दिवसापर्यंतचे विधी त्या त्या दिवशी करावयाचे असतात परंतु अलीकडे पहिल्या दिवसापासून दहाव्या दिवसापर्यंत प्रत्येक दिवशी करावयाचे सर्व विधी दहाव्या दिवशी करण्याची प्रथा पडत चालली आहे. याला कारणे अशी आहेत..**

१) दिवस कार्य करण्याचे विधिवत ज्ञान स्वतः कर्त्याला त्याचप्रमाणे आप्तेष्ट, नातेवाईक, समाजातील व्यक्ती, शेजारी, गावातील व्यक्ती यापैकी कोणालाही नसणे.
२) प्रत्येक दिवशी कार्य करण्यासाठी विधीचे ज्ञान असणारी व्यक्ती, गुरुजी पुरोहित वगैरे उपलब्ध होऊ न शकणे.
३) कार्य करण्यासाठी विधीवत ज्ञान असणारी व कार्यासाठी विधिवत मार्गदर्शन करून देणारी व्यक्ती दहा दिवस उपलब्ध होऊ शकत असली तरी तिचे मानधन व नऊ दिवस करावयाचा भीतीचा खटाटोप परवडणारे नसणे.
४) दहा दिवस विधीसाठी खटाटोप करणे व वेळ देणे हे इच्छासापेक्ष नसणे.
५) याव्यतिरिक्त आणखीही काही कारणे असू शकतील.

मंडळी, परलोक शास्त्र काय सांगते आणि अध्यात्म काय सांगते यामध्ये जर काही विश्वास नाही वाटत असेल तर दिवंगताचे अंत्यष्टी कर्मे. श्राद्धविधी कर्मे ही कर्तव्यदक्षतेने येतोचित करणे आवश्यक असल्याचे अंतरात्म्यास नक्कीच पटेल, मान्य होईल. एखादी गोष्ट कर्तव्य म्हणून पार पाडावयाची असल्यास ती पार पाडण्याचे कर्म हे सफल व्हावे असे कोणाला बरे वाटणार नाही किंबहुना अपेक्षापूर्तीसाठी देवाकडे प्रार्थना केल्या जातात. अर्थातच जाणकारांनी अभ्यासकांनी तज्ज्ञांनी सुचित केलेल्या योग्य शास्त्रोक्त पद्धतीने नियोजनबद्ध कालसापेक्ष क्रिया व कर्म अर्थात कार्य केल्यास ते अपेक्षित फलप्राप्ती लाभून देते. असे असता वरील कारणे पुढे आणून अवेळी, अपूर्ण वेळी आणि अज्ञानाने कार्यभाग पार पाडण्यात काय बरे तारतम्य असू शकते?

विधींची साधारण माहिती व ज्ञान घेऊन आपल्याला कमाल नसले तरी किमान शास्त्रोक्त व यथोचित कार्य साधता यावे यासाठीच ही माहिती घरोघर पोहोचवण्याचा हा प्रयोग आहे. तो सार्थ साथी होण्यासाठी आपण सर्वांनी सहयोग द्यावा. सदर माहिती प्रसारित करावी ही विनम्र अपेक्षा आहे. असो.

दहाव्या दिवशीचा विधी ' ग्रामद् बहि: सरीत्संगमे महाजल संन्निधौ वा गत्वा ' या ग्रंथांतील उल्लेखाप्रमाणे गावाच्या बाहेर अन्य अशा ठिकाणी, जेथे नद्यांचा संगम असेल, ओहळांचा संगम असेल, वाळते पाणी किंवा पाण्याचा साठा (जलाशय) असेल अशा ठिकाणी किंवा तीर्थक्षेत्री, समुद्राच्या ठिकाणी किंवा शंकरांचे मंदिर असलेल्या ठिकाणी किंवा स्मशानात (स्मशान हे रुद्राचे ठिकाण आहे) करावा.

दहाव्या दिवशीचा विधी हा दिवंगत व्यक्तीच्या आत्म्याची मोहाच्या बंधनातून, मायेच्या प्रभावातून सुटका झाली आहे किंवा कसे हे आजमावण्यासाठी करण्याचे प्रयोजन असते. दहाव्या दिवशीचे कार्य हे दिवंगतच्या प्रेतत्त्वातील निवृत्तीसाठी तर असतेच शिवाय प्रीतत्त्वनिवृत्तीनंतर त्या आत्म्याला मोक्षासाठी उत्तम लोकगती प्राप्त होण्याच्या मार्गी लावण्यासाठी असते. या श्राद्धात १)प्रेतरुपी दिवंगत व्यक्तीचा आत्मा, २)प्रेतसखी/खा, ३)स्मशानवासी रुद्र, ४)यम आणि ५)वायस (कावळा) यांना उद्देशून सर्वांची यथोपचारिक पूजाअर्चा करून सर्वांना भुकेच्या निवारणार्थ पिंड आणि तहानेच्या निवारणार्थ दुध व उदक कुंभ प्रदान केले जातात. तिळाचे पाणी दिले जाते. प्रेतात्म्याच्या पुढील वाटचालीत मार्गातील शिदोरी व पूरक साहित्य म्हणून दहा प्रकारची दाने ' दशदाने ' दिली जातात.

दशमदिन श्राद्धाच्या या विधीमध्ये कावळ्यासाठी दिलेल्या वायसपिंडाला कावळ्याने स्पर्श (काकस्पर्श) करावा अशी अपेक्षा असते. कावळा हा पितरांचा प्रतिनिधी मानला जातो. आत्म्याच्या स्वरूपाची हालचालींची कावळ्यास उत्तम जाण असते. नक्षत्रांमधील मघा नक्षत्राची देवता ' पितर ' आहे आणि पितरांचा सुचक ' कावळा ' आहे. कावळ्यासाठी ठेवलेला पिंड (वायस पिंड) जर दहाव्या दिवशीच्या श्राद्धात कावळ्याने स्वीकारला अर्थात कावळ्याने त्या पिंडाला ' काकस्पर्श ' केला तर दिवंगत व्यक्तीचा आत्मा हा निर्मोही, मोहमुक्त, मायामुक्त होऊन प्रेतत्वनिवृत्ती घेण्यास पात्र व सज्ज झाला असल्याचे मानले जाते. १)ध्रुव, २)धर, ३)सोम, ४)आप, ५)अनिल, ६)अनल, ७)प्रत्युष व ८)प्रभास या तमोगुणी अष्टवसुरुपी पितरांमध्ये जाण्याची प्राथमिक पात्रता (आपण प्रवेश पात्रता म्हणूयात) मृताच्या प्रेतात्म्यास प्राप्त आहे असे मानले जाते. ही एक दिवंगताच्या नातेवाईकांसाठी समाधानाची बाब असते म्हणूनच कावळ्याने पिंडस्पर्श (काकस्पर्श) केल्यावर नातेवाईक व आप्तेष्टांमध्ये दशमदिन विधी फलद्रूप झाल्याचे समाधान असते.

यापूर्वी व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या आत्म्याच्या प्रवासाबाबत आपण माहिती घेतलेली आहेच. आत्म्याचा मोक्षासाठीचा प्रवास हा पुण्याईच्या बळावर सुसाध्य होत असतो. प्रेतत्व निवृत्तीसाठी अंत्येष्टी कार्यापासून पुढील सर्व प्रेतश्राद्धात यथोचित विधी, पूजा, अर्चा व दानधर्म करून दिवंगताच्या प्रेतात्म्यास उद्देशून तसेच संबंधित देवतांना उद्देशून विधीचे पुण्य अर्पित करावयाचे असते.

**(उर्वरित पुढील भागात)**

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

### एक दुजे के लिए' शतकातील सर्वोतम प्रेमकहाणी



प्रेमकहाणी वर आधारीत अनेक चित्रपट मी पाहिले आहेत. पण कमल हसन आणि रती अग्नीहोत्री यांचा ' एक दुजे के लिए ' या चित्रपटा ईतका परिणाम कारक दुसरा चित्रपट मी अजून तरी पाहिला नाही. तेव्हा अल्लड वयातले आम्ही हा चित्रपट पाहून अक्षरक्षः वेडे झालो होतो. कहाणी इतकी अप्रतिम होती की पहिले प्रेम करणाऱ्या प्रत्येक तरूण तरूणींच्या हृदयाला थेट भिडणारी होती. प्रत्येकाला आपलीच कहाणी वाटायची.

कमल कमालीचा अभिनेता आहे. त्याने आपल्या कारकिर्दीतला सर्वोतम अभिनय या चित्रपटात साकार केला आहे. त्याने साकारलेला वासु आपणच आहोत अस प्रत्येक तरुणाला वाटायचे. रती अग्नीहोत्रीचा सहज सुंदर अभिनय चाहत्यांना ईतका भावला होता की या दोघांनी कमाल केली होती. १९८१ साली प्रदर्शीत झालेला चित्रपट पहाण्यासाठी चाहत्यांची झुंबड उडाली होती. देशभरातील चित्रपटगृहात हा चित्रपट तुफान गर्दित चालू होता. चित्रपट पाहिल्यावर देशभरातील प्रेमीयुगुल आत्महत्या करत होते. सगळेच तरूण तरूणी स्व:ताला चित्रपटातील नायक आणि नायीका वासु व सपना समजू लागले होते. इतक्या आत्महत्या झाल्या की सरकारला दखल घ्यावी लागली. चित्रपटाचा क्लायमॅक्स बदलावा लागला.

कमल हसन आपली प्रत्येक भुमिका अप्रतिम करतो. दुधात साखर जितक्या सहज मिसळते तितक्याच सहज तो एखाद्या पात्राच्या शिरतो.' एक दुजे के लिए ' कमल हसनचा पहिलाच हिंदी चित्रपट होता.

मुळात सुप्रसिद्ध दाक्षिणात्य चित्रपट निर्माते के. बालाचंद यांचा 'मारो चरीत्र' हा मुळ तामिळी चित्रपट होता. त्यात कमल हसन, सारीका आणि माधवी यांनी काम केले होते. हा चित्रपट दक्षिणेत सुपर डूपर झाला होता. या तमीळ चित्रपटाचा हिंदी रिमेक के. बालचंद यांना करायचा होता.

त्यासाठी त्यांनी कमल हसन सोबत रती अग्नीहोत्री ला साईन केले होते. गितकार म्हणून आनंद बक्षी व संगितकार लक्ष्मीकांत प्यारेलाल यांना जबाबदारी सोपविण्यात आली होती. मुळ तमिळ चित्रपट गायक एस. पी. बालसुब्रमन्यम यांना कायम ठेवण्यात आले होते.

परंतू लक्ष्मीकांत प्यारेलाल यांना एस. पी. बालसुब्रमन्यम गायक म्हणून मान्य नव्हते. पण के. बालाचंद यांनी आपला आग्रह कायम ठेवला होता. एस. पी. बालसुब्रमन्यम हिंदी चित्रपटात नवखे होते. त्यांनी एकाही हिंदी चित्रपटासाठी गाणे गायले नव्हते.

गोव्यामध्ये शुटींग सुरू झाले तेव्हा गोव्याचा सर्वांगसुंदर समद्र किनारा आणि नव्या उमेदिचे दोन युवा प्रेमी 'वासु' आणि 'सपना'. वाळूवर लिहिलेली ही दोन नावे सगळेच सिनेरसींकाच्या हृदयाला भिडणारे होते. चित्रपट पुर्ण झाल्यावर के. बालाचंद यांनी आपला हा चित्रपट प्रसिद्ध शोमन राजकपूर यांना दाखविला. कारण अशा प्रकारचा पहिला 'बॉबी ' हा पहिला चित्रपट इंडस्ट्रीत सुरवातीला राज कपूर यांनीच आणला होता. राज कपूर यांना चित्रपट आवडला पण चित्रपटाचा शेवट त्यांना फार विदारक वाटला. त्यांनी तो बदलन्यास सुचविले परंतू के. बालाचंद आपल्या मतावर ठाम होते. त्यांनी शेवट बदलला नाही. राज कपूर यांचे भाकीत खोटे ठरले या चित्रपटाच्या शेवटामुळेच हा चित्रपट पहायला प्रेमी युगूलांनी गर्दि केली. परंतू राज कपूर यांची भीती खरी ठरली. हा चित्रपट पाहून त्या काळात अनेक प्रेमी प्रेमीकांनी एकत्र आत्महत्या केल्या.

लता मंगेशकर आणि एस. पी. बालसुब्रमन्यम यांच्या आवाजातील या चित्रपटातची सर्वच गाणी सुपरहीट झाली. सन ५ जून १९८१ साली हा चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शीत झाला आणि एक ईतिहास घडला. ना भूतो ना भविष्यती अशी गर्दि मुंबईतल्या सिनेमागृहात झाली. चित्रपटाची गाणी, संगीत, कहाणी सर्वच अंगानी कळस गाठला. हा चित्रपट अजरामर झाला.

या चित्रपटासाठी अनेक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. कमल हसन आणि रती अग्नीहोत्री एका रात्रीत हिंदी फिल्म इंडस्ट्री मध्ये स्टार झाले. ऐशीच्या दशकातील पिढीला हा चित्रपट आजही आठवत असेल. देशभरातील तरूण तरूणी हा चित्रपट पहाण्यासाठी गर्दि करीत होते. सगळीच गाणी सुपरहीट होती परंतू 'हम बने तूम बने एक दुजे के लिए ' हे गाणे आणि 'तेरे मेरे बीच मे कैसा है ये बंधन अंजाना' यासारखी गाणी प्रत्येकाच्या तोंडातून ऐकू येत होती. खरी मजा चित्रपट प्रत्यक्ष पडद्यावर पाहिला असेल त्यांनाच माहित आहे.

# वाटूळ




(पान २ वरून )

काही कामानिमित्त घरी गेला होता. तो येण्याची वाट पाहण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हताच. तब्बल दोन तासांनी तो दुकानात आला. टायर खोलून त्याने ट्युब बाहेर काढली. ट्युबमध्ये खिळा घुसलाय. त्यामुळे ट्युब जवळ जवळ खराब झाल्याचं तो म्हणाला. त्याच्याकडे त्या मापाची नवी ट्युब नव्हतीच. त्याने तीन चार पॅचेस मारून 'पंक्चर' काढून दिला. टायर घेऊन परत त्या हॉटेलपर्यंत आलो तर चांगलाच काळोख पडला होता. मात्र तेवढ्यात पाऊस थांबला होता. हॉटेलवाल्या माऊलीने आमच्या ससेरावांची चांगली काळजी घेतली होती. त्यांना कोबीची पानंही खायला दिली होती. त्या माऊलीचे आभार मानून ताथून पुढे निघालो. मी पाहिलंवतर तोपर्यंत तो मघाशीचा टायरवाला दुकान बंद करून घरी गेला असावा. दुकान बंद दिसत होतं. तरी राधाकृष्ण म्हणालाच, 'आता पंक्चर झाला तर काय खरा नाय. सावकाश चालव.' वाटूळ फाटा मागे टाकून पुढे चढात आलो. चढ चढून वर आलो तर स्कुटर अचानक गचके देत बंद पडली. खाजवणवाडकरने शिकवलेले सारे प्रथमोपचार करूनही स्कुटर चालू होईना. ह्या साऱ्या खटापटी करेपर्यंत काळोख पडलाच. घड्याळात पाहिलं तर आठ वाजलेले. परत मुरुमुरु पाऊस सुरु झालाच. इकडे तिकडे पाहिलं तर डावीकडे महामार्गाच्या बाजूस एक छोटे मंदिर होते. आजूबाजूस जंगल आणि तिथेच अगदी छोटेसे मंदिर. आम्ही स्कुटर बाजूला उभी करून मंदिरात गेलो. मंदिरात एकच छोटा बल्ब होता. आजूबाजूस पाहिलं तर कुठेही माणसांच्या घरांचं चिन्ह दिसत नव्हतं. सशांचा बॉक्स मंदिरात एका कोपऱ्यात ठेवला. आता गाडीचं काय ते उद्याच बघू. आधी आजची रात्र इथेच काढू असा दोघांनीही विचार केला आणि सोबतच्या बॅगेतून दोन टॉवेल बाहेर काढून ते जमिनीवर अंथरले आणि त्या देवाच्या सान्निध्यात मस्त झोपी गेलो.

हे सारं आठवायला कारणीभूत ठरला तो विराज चव्हाणचा काव्य लघुपट, 'वाटूळ'. वाटूळ खरंच मस्त गाव आहे. या गावाचं वर्णन लघुपटात अगदी सुंदर स्वरुपातच पहावयास मिळतं. हा लघुपट कोकणातील प्रत्येक कवीने आवर्जून पहायला हवा. कदाचित आणखी एखाद्या कवीला वाटेल, आपणही आपल्या गावाचा करायला हवा असा काव्य लघुपट.






**कु. शमिका नयनेश मुलूख**

# सरकारी योजना/नोकरी

## पिठाची गिरणी योजना 2024

**राज्यातील महिलांना स्वतःचा एखादा घरगुती लघुउद्योग सुरु करता यावा या उद्देशाने महिला व बालकल्याण विभागामार्फत सुरु करण्यात आलेली एक योजना आहे.**

राज्यातील ग्रामीण भागातील बहुतांश महिला सुशिक्षित आहेत परंतु त्यांना ग्रामीण भागात कुठल्याच प्रकारचे रोजगाराचे साधन उपलब्ध नसल्याकारणामुळे बेरोजगार आहेत. त्यामुळे महिला एखादा घरगुती उद्योग सुरु करण्यासाठी उत्सुक असतात परंतु आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्या कारणामुळे त्यांना स्वतःचा एखादा उद्योग सुरु करता येत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना घरगुती एखादा उद्योग सुरु करता यावा व थोडेफार पैसे कमावता यावेत जेणेकरून ते स्वतःच्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पुऱ्या करू शकतील या उद्देशाने Mofat Pith Girni Yojana सुरु करण्याचा एक महत्वाचा असा निर्णय घेतला.

या योजनेअंतर्गत राज्यातील अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांना पिठाची गिरणी खरेदी करण्यासाठी 100 टक्के अनुदान देण्यात येते त्यामुळे महिलांना स्वतःजवळील रक्कम भरण्याची आवश्यकता नाही.

**या लेखात दिली आहे त्यामुळे कृपया करून तुम्ही हा लेख शेवट पर्यंत वाचा व या योजनेचा लाभ मिळवा तसेच तुमच्या परिसरातील जे कोणी आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबे असतील तर त्या कुटुंबातील महिलांना या योजनेची माहिती अवश्य द्या किंवा आमचे हे आर्टिकल त्यांना शेयर करा जेणेकरून ते या योजनेअंतर्गत अर्ज करून मोफत गिरणी वाटप योजनेचा लाभ मिळवून स्वतःचा घरगुती उद्योग सुरु करू शकतील.**

**योजनेचे नाव**
**मोफत पिठाची गिरणी योजना**
**उद्देश**
**महिलांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करणे.**
**लाभ**
**100 टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाते.**
**लाभार्थी**
**आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील महिला**
**अर्ज करण्याची पद्धत**
**ऑफलाईन**

### पिठाची गिरणी योजना 2023 चे उद्दिष्ट

- महाराष्ट्र राज्यातील महिलांचा सामाजिक तसेच आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने पिठाची गिरणी योजनेचा उद्देश आहे.
- महिलांना ग्रामीण भागात घरीच एखादा उद्योग सुरु करता यावा व थोडेफार पैसे कमावता यावेत जेणेकरून त्या आपल्या कुटुंबाच्या आर्थिक गरज पुऱ्या करू शकतील यासाठी या योजनेची सुरुवात करण्यात आलेली आहे.
- ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधारावे.
- राज्यातील महिलांना आत्मनिर्भर बनविणे.
- महिलांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करणे.
- महिलांना स्वतःच्या पायावर उभे करणे. [पिठाची गिरणी योजना 2023]

### मोफत गिरणी वाटप योजना अंतर्गत दिले जाणारे आर्थिक अनुदान

- पिठाची गिरणी योजनेअंतर्गत लाभार्थ्यास पीठ गिरणीच्या एकूण किमतीच्या 100 टक्के अनुदान दिले जाते.
- पीठ गिरणी योजना महाराष्ट्र चे लाभार्थी
- महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील महिला

### Free Flour Mill Scheme In Maharashtra अंतर्गत होणार फायदा

- Pith Girni Yojana अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना घरगुती रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.
- या योजनेअंतर्गत नवीन पिठाची गिरणी विकत घेण्यासाठी राज्य शासनाकडून 100 टक्के अनुदान उपलब्ध करून दिले जाते.
- या योज़नेच्या सहाय्याने राज्यातील ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधारेल.
- राज्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल.
- राज्यातील महिलांचा सामाजिक तसेच आर्थिक विकास होईल.
- महिलांना घरातच रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांना नोकरीसाठी घरापासून दूर जाण्याची आवश्यकता भासणार नाही.
- राज्यातील ग्रामीण भागातील बेरोजगारी संपेल.
- राज्यातील महिला स्वतःच्या पायावर उभे राहून आत्मनिर्भर बनतील. [पिठाची गिरणी योजना 2023]

### Free Flour Mill Yojana Maharashtra 2023 चे नियम व अटी

- अर्जदार महिला महाराष्ट्र राज्याची मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- फक्त महाराष्ट्र राज्यातील महिलांनाच या योजनेचा लाभ दिला जाईल.
- महाराष्ट्र राज्याच्या बाहेरील महिलांना पिठाची गिरणी योजनेचा लाभ दिला जाणार नाही.
- फक्त ग्रामीण भागातील महिलांनाच या योजनेचा लाभ दिला जाईल.
- शहरी भागातील महिलांना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.
- फक्त आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील महिलांनाच या योजनेचा लाभ दिला जाईल.
- अर्जदार महिलेच्या कुटुंबातील कोणी सदस्य शासकीय कार्यालयात नोकरी करत असता कामा नये.
- अर्जदार महिलेने केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे सुरु एखाद्या योजनेअंतर्गत पीठ गिरणीचा लाभ मिळवला असेल तर अशा परिस्थितीत त्या महिलेला या योजनेचा लाभ दिला जाणार नाही.
- एकाच कुटुंबातील अनेक मुली/महिला जरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र असल्या तरी त्यातील एकाच मुली/महिलेला या योजनेचा लाभ घेता येईल.
- योजनेचा लाभ मिळवण्यासाठी अर्जदार महिलेचे वय 18 वर्ष ते 60 वर्ष दरम्यान असणे आवश्यक आहे.
- अर्जदार महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1 लाख 20 हजारांपेक्षा जास्त असता कामा नये. [पिठाची गिरणी योजना 2023]

### Pithachi Girani Yojana अंतर्गत आवश्यक कागदपत्रे

- अर्ज ,आधार कार्ड
- रेशन कार्ड
- रहिवाशी दाखला
- कुटुंबाचा उत्पनाचा दाखला (वार्षिक उत्पन्न 1 लाख 20 हजारांच्या आत असणे आवश्यक)
- अनुसूचित जाती/जमाती चा जातीचा दाखला
- बँक खात्याचा तपशील (अर्जदार यांचे बँक खात्यावर अनुदान वर्ग करण्यासाठी अर्जदार याचे बँक पासबुक पहिल्या पानाची झेरॉक्स (यावर अर्जदाराचे नाव,बँकेचे नाव,शाखा,खाते क्रमांक व IFSC कोड नमूद असावा.) व हे बँक खाते सुरु असल्याबाबत मागील तीन महिने खात्यात व्यवहार झालेल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडावी.)
- व्यवसायासाठी जागा उपलब्ध असल्याबाबत नमुना नंबर 8 अ चा घराचा उतारा जोडावा.
- विद्युत पुरवठा सोय असलेबाबत एम.एस.ई.बी. च्या नजीकच्या बिलाची झेरॉक्स प्रत.
- मोबाईल नंबर
- ई-मेल आयडी
- पासपोर्ट आकाराचे फोटो
- प्रतिज्ञा पत्र

### Pithachi Girni Yojana Maharashtra अंतर्गत ऑफलाईन अर्ज करण्याची पद्धत

- अर्जदाराला सर्वात प्रथम आपल्या क्षेत्रातील ग्रामपंचायत कार्यालयातून किंवा जिल्ह्यातील महिला व बालकल्याण विभागात जाऊन पिठाची गिरणी योजनेचा अर्ज घ्यावा लागेल व अर्जात विचारलेली सर्व माहिती भरून सोबत योग्य ती कागदपत्रे जोडावी लागतील व सदर अर्ज जमा करावा लागेल.
- अशा प्रकारे तुमची मोफत पिठाची गिरणी योजनेअंतर्गत अर्ज प्रक्रिया पूर्ण होईल. [पिठाची गिरणी योजना 2023]

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862



# वेंगुर्ल्याचो बंधारो

मिलन आंदुर्लेकर
आंदुर्ले , वेंगुर्ला

वेंगुर्ल्याचो बंधारो माझ्या नजरेक एकदम जुना, पन अतिशय महत्वाचो आसा. असो पान्याचो नजारो येता नजरेसमोर मन हरकून जाता . पूर्वी कोकणात जय थंय बांधरो दिसायचो. गावचो बांधरो आपल्या गावचा रक्षण करणारो आसता. बांधारो म्हणजे गावचा कवचं. आपल्या वेंगुर्ल्यात, पाऊस पडलो की व्हाळाचा पाणी खुळखुळूक लागता. त्यातसुन वहाणारे ताजे फडफडीत मळाये, त्यांचो मग चुलीत भाजलेलो वास आणि पावसात त्याचो घेतलेलो स्वाद त्याचा वरनंन दीकी करूचा म्हटला तरी करूक येत नाय.

असो बंधारो, त्याच्या पाण्याक अडयण्यासाठी बांधलेलो बंधारो आपल्या गावाक सुरक्षित ठेयता. आमच्या गावाचो बंधारो मॉप वर्षांपूर्वी बांधलेलो आसा. गावाच्या लोकानी त्या काळातल्या साधनांनी आणि आपल्या मेहनतीना तो बांधलेल्यानी. आजच्या काळात तंत्रज्ञान जरी वाढलेला असला , तरी त्याकाळातली मेहनत आणि जिद्द अजूनही आमच्या आठयनीत जित्यो आसत. बंधारो नद्यांचा पाणी साठून ठेयता आणि पावसाळ्यातल्या पान्याची नासाडी होऊक देत नाय. ह्या पाणी मग गावच्या शेतीक आणि पिण्याक वापरला जाता.

बंधाऱ्याच्या बाजूक उभ्या रव्हला की तिथून व्हानारा पानी बघल्यार मनाक असो आनंद व्हता तो आनंद खायव गमत नाय. पान्याचो खळखळाट आणि बंधाराच्या बाजूक उगवलेली झाडा ,पाना आणि फुलानी सगळ्या रानारं येगळी झांक दिसता. पावसातलो निसर्ग एकदम वेगळोच दिसता. बंधाराच्या बाजून येगयेगळे पक्षी घुरततं, त्यांचो चिवचिवाट, पाण्यातली मासळी, आणि गावातल्या ल्हान मुलांचो त्यांका बघून चाललेलो दंगो माका माझ्या बालपणाक व्हरता.

बंधारो निसतो पाण्याक अडवत नाय तर आपल्या गाव रहाटीचा जीता उदाहरण गमता. गावाची एकि, त्याची मेहनत, आणि निसर्गाचा केलेला जतन या सगळ्याचा प्रतिक आसा. बंधाऱ्याचा पानी जसा गावाचा जीवन घडयता , तस्साच बंधाऱ्याची याद आपनाक आपल्या मुळाशी जोडून ठेयता.

आजच्या आधुनिक जगात, बंधाऱ्याचा महत्व अधिकच वाढला आसा. पान्याची बचत, निसर्गाचा जतन, आणि आपलो वारसो जपन्याक या बंधाऱ्याच्या रूपान आपल्या समोर येता, वेंगुर्ल्यातलो बंधारो माका जुन्या साधनांन आणि मेहनतीनांनं केलेला काम किती दीर्घकाळ टिकता आणि आपल्याक कसा जपून ठेयता ता शिकवता.






# रतांबेची सोला



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

हल्ली शिरा पडली ती दरवर्साक रतांबे उशीराच धरतत. मिरगाचो पाव्स पडाक नि रतांबेक भर येव्क एकदम होता. आता एकदा पिकलल्या रतांब्यांवर पाव्स पडलो काय, काय उपयोग हा त्या रतांब्यांचो? रतांबे म्हणजे कोकमाची फळा ओ. आम्ही रतांबेच म्हणतव. आमच्या परड्यात ना दहा बारा तरी झाडा आसत रातांब्याची. आताशे बघशात तर पिकलल्या रतांब्यांनी झाडा नुसती भरान गेलीहत. अगोदर बाबा रतांब्यांवर चढायचे. गडका घेवन कच्चे, पिके रतांबे घसरून घालायचे. पुर्वीची पोराटोरा पण रतांबेंवर चढायची. पडलले रतांबे निवडून न्यायची. हिरव्या रातांब्याचो दोडो करून विकायची. रतांबेच्या फळाचा कायच फुकट नाय जाना. बिये पण सुकवन नि भरडून किलोच्या दरात विकतत. बियांचा तेल काढतंत, मुटॅल करतत. मुटॅल लय औषधी. हातापायाच्या सांधेदुखीवर रामबाण उपाय.

रतांब्यांची सोला करणा म्हणजे लय व्याप. सोला म्हणजे कोकमा ओ. आम्ही कोकमाक सॉल म्हणतव. 'सोलकढी' ह्यो सोलांवरसूनच तयार झाललो शब्द. म्हंजे आमचे मालवणी शब्द खय खय जाव्न पोचलेहत बघा. पुर्वी आताच्या सारखे प्लॅस्टिक कागद नाय व्हते. तेव्हा माडाच्या विणलल्या झापांवरच दिवसभर सोला सुकायची. शिवाय सोलांसाठीचो आगुळ ठेव्क आताच्या सारखे टब नाय व्हते. लाकडी नायतर दगडी डोणयेत असो आगुळ ठेवची पद्धत व्हती. दररोज संध्याकाळी दिवसभर सुकवलली सोला आगुळाच्या डोणयेत रात्रभर बुडवुन ठेवायची नि सकाळी परत झापांवर सुकत घालायची. आठ ते दहा दिवस तरी ह्या रोजचा काम. अशी इतकी मेहनत जेव्हा करतलव तेव्हा खय सोला तयार होतत. आमची मालवणी सोला आणि इतर ठिकाणची सोला म्हणजे कोकमा हेच्यात जमीन अस्मानाचो फरक आसा. आमच्या सोलांची सर त्या कोकमाक येवचीच नाय.

आज खयचोव चाकरमानी मुलखातसून मुंबैक जावदे, तेच्या भेटेत सोला असतलीच. सोलाशिवाय तेची भॅट पुरी होता काय ओ? आता हल्ली आधीच्यासारखी मेहनत करुची कोणाक इच्छा रवलीहा. आता सगळा काय ता आयता होया. रतांबेवर चढाक कोणाक येता? रतांबे सोलूक कोणाक येतत. आगुळ करूक कोणाक येता? आणि सोला तरी कोण करुक बघता? जा ता म्हणता, सोला करुची वाटतत. पण वात होता ना रतांबे सोलूक बसल्यार? आता सोला हवी प्रत्येकाक. पण सोला करुसाठीची मेहनत करुक नको. खरा ना?





# चिकन रोल्स



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

चिकन रोल्स हे एक स्वादिष्ट आणि लोकप्रिय स्नॅक आहे. खालील रेसीपीतून तुम्ही घरी चिकन रोल्स कसे तयार करायचे ते शिकू शकता.

**साहित्य:**

**चिकन फिलिंगसाठी:**

- २५० ग्राम चिकन ब्रेस्ट, छोटे तुकडे करून
- १ मध्यम कांदा, बारीक चिरलेला
- १ मध्यम टोमॅटो, बारीक चिरलेला
- १/२ कप शिमला मिर्च, बारीक चिरलेली
- १ टेबलस्पून अद्रक-लसूण पेस्ट
- २ टेबलस्पून तेल
- १ टीस्पून हळद
- १ टीस्पून लाल तिखट
- १ टीस्पून गरम मसाला
- चवीनुसार मीठ
- १ टीस्पून लिंबू रस
- २ टेबलस्पून कोथिंबीर, बारीक चिरलेली

**चिकन फिलिंगसाठी:**

1. एका पॅनमध्ये तेल गरम करा. त्यात कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परता.
2. त्यात अद्रक-लसूण पेस्ट घालून चांगले परता.
3. आता चिकनचे तुकडे घालून उच्च आचेवर परता, जोपर्यंत ते अर्धवट शिजत नाहीत.
4. त्यात टोमॅटो, शिमला मिर्च घालून चांगले मिक्स करा.
5. हळद, लाल तिखट, गरम मसाला, आणि मीठ घालून चांगले मिक्स करा.
6. चिकन पूर्णपणे शिजेपर्यंत आणि मिश्रण कोरडे होईपर्यंत शिजवा.
7. शेवटी लिंबू रस आणि कोथिंबीर घालून मिक्स करा. फिलिंग तयार आहे.

**रोलसाठी:**

- मैदा आणि पाणी मिक्स करून एक पातळ पेस्ट तयार करा.
- चपात्या किंवा पराठे तयार करून घ्या. (चपाती/पराठे तयार नसतील तर नवीन बनवून घ्या.)
- प्रत्येक चपाती/पराठ्यावर चिकन फिलिंग ठेवा आणि रोल करा.

**सर्व्हिंग:**

- गरमागरम चिकन रोल्स सॉस किंवा चटणी सोबत सर्व्ह करा.
- या पद्धतीने तुम्ही स्वादिष्ट चिकन रोल्स तयार करू शकता. मजा करा!




## समाजभान

माया सावंत ,
काळबादेवी ,
मुंबई

# कोकण : निसर्गाची शांतता आणि सौंदर्य

कोकण, आपल्या महाराष्ट्राचं हिरवं सोनं, जे आपल्या निसर्गसंपन्नतेनं आणि सौंदर्यानं सगळ्यांचं मन मोहून टाकतं. कोकणाचं सौंदर्य म्हणजे एक निसर्गाचा खजिना आहे, जिथे समुद्र, डोंगर, नद्या, आणि वनस्पती एकत्र येऊन एक अद्वितीय चित्र तयार करतात.

कोकणातील समुद्रकिनारे हे जगातील काही सर्वोत्तम समुद्रकिनारे मानले जातात. गणपतीपुळे, तारकर्ली, आरे-वारे, आणि देवगड सारख्या सुंदर किनाऱ्यांनी कोकणाचं सौंदर्य वाढवलं आहे. त्या पांढऱ्या वाळूत चालताना, समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकताना, आणि सूर्यास्ताचं अद्भुत दृश्य पाहताना मन अगदी शांत होतं.

कोकणातील डोंगररांगा आणि त्यावरील हिरवीगार वनराई हे देखील कोकणाचं सौंदर्य वाढवतात. सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये असलेल्या लहान-मोठ्या गावांतून फिरताना, आपल्याला निसर्गाच्या सान्निध्यात असल्याचा अनुभव येतो. आंबा, काजू, नारळ, आणि सुपारीच्या बागा या भागात सर्वत्र दिसतात. ह्या झाडांमधून निघणारा सुगंध आणि ताजेतवाने करणारा वारा मनाला प्रसन्न करतो.

कोकणातील नद्याही तितक्याच सुंदर आहेत. वशिष्ठी, शास्त्री, सावित्री, आणि ताम्रपर्णी या नद्यांच्या काठावर वसलेल्या गावांतून फिरताना, नद्यांच्या खळखळाटाचा आनंद घ्यायला मिळतो. या नद्यांवर असलेल्या पुलांवरून चालताना, त्यांचा परिसर अत्यंत आकर्षक दिसतो.

कोकणाचं सौंदर्य फक्त निसर्गातच नाही तर तिथल्या संस्कृतीत आणि खाद्यपदार्थांमध्येही आहे. कोकणातील लोकांच्या साधेपणात आणि त्यांच्या आदरातिथ्यात मन रमून जातं. तळलेला मासा, सोलकढी, उकडीचे मोदक, आणि आंब्याचं सासव हे कोकणातील खास पदार्थ आहेत, जे खाण्यात आनंद देतात.

कोकणाचं सौंदर्य म्हणजे निसर्गाच्या विविध रंगांचं एक सुंदर मिश्रण आहे. जिथे समुद्राचं निळं, वनांचं हिरवं, सूर्यास्ताचं लाल, आणि नद्यांचं पारदर्शक पाणी एकत्र येऊन एक अप्रतिम चित्र तयार करतात. कोकणाला भेट देताना, ह्या निसर्गाच्या खजिन्याचं सौंदर्य आपल्या मनात कायमचं कोरलं जातं. कोकणातला पाऊस म्हणजे एक अनोखा अनुभव. मी माझ्या कोकणी घराच्या अंगणात उभी राहून हे अद्भुत दृश्य पाहते. समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या आमच्या या छोट्याशा घरातून पावसाचे दृश्य अवर्णनीय असते.


पाऊस पडायला सुरुवात झाली की आकाशात काळेकुट्ट ढग जमा होतात. ते ढग गडगडाट करताच समुद्राच्या लाटा आणखीनच उधाणावर येतात. पावसाच्या थेंबांचा आवाज आणि समुद्राच्या लाटांचा गडगडाट, हे एकमेकांमध्ये मिसळून एक अनोख संगीत निर्माण करतात.

आमच्या घराच्या खिडकीतून दिसणाऱ्या नारळाच्या झाडांवर पावसाचे थेंब झोपड्यांच्या छपरावर थडकतात, तेव्हा त्या थेंबांच्या आवाजाने मनाला एक सुखद शांती मिळते. हे दृश्य पाहून मन अगदी ताजेतवाने होते. झाडांच्या पानांवरून निघणारा पाण्याचा ओघळ, जणू काही निसर्गाचं गाणच गात असतो.

समुद्राच्या किनाऱ्यावर पसरलेली वाळू, पावसामुळे थोडी ओली होते. समुद्राच्या लाटांच्या सोबत आलेले शंख, शिंपले, हे सर्व एकत्र येऊन एक सुंदर निसर्गचित्र निर्माण करतात. पाऊस थांबला की समुद्राच्या लाटांचा आवाज अजून स्पष्ट होतो. त्या लाटांच्या गडगडाटात एक प्रकारची शांतता असते, जणू काही समुद्राने आपल्या लाटांमध्ये संपूर्ण जगाला शांत करण्याची ताकद आणली आहे.

पावसाळ्यातील कोकणातील निसर्गाचे हे रूप पाहून मन अगदी हरखून जाते. पावसाच्या थेंबांमध्ये दडलेली शांतता आणि समुद्राच्या लाटांमध्ये दडलेले सौंदर्य यांचा अनुभव घेण्यासाठी कोकणासारखे दुसरे ठिकाण नाही. या निसर्गाच्या संगतीने मी माझ्या कोकणी घरात अगदी शांत आणि आनंदी होते. प्रत्येक पावसाळ्यात या दृश्याचा आनंद घेताना मनाला नवी उमेद आणि आनंद मिळतो.

या सौंदर्यला अबाधित राखण्याची जबाबदारी आता कोकणवासीयांची आहे. येणार काळ हा कोकणची परीक्षा घेणारा आहे. वाढत चाललेल बांधकाम, फ्लॅट संस्कृती , वाढत चाललेला कचरा, विकासाच्या नावाखाली वाढत चाललेली वृक्षतोड यामुळे कोकणच सौंदर्य कसे टिकवता येईल याचा विचार करायला हवा



## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

### आईनं सांगितलेली गोष्ट

माझी आई अशिक्षित ,पण तिने मला ज्या अनेक गोष्टी सांगितल्या, समाजात वागताना कुणाशी कसं वागाव, बोलावं, या अश्या अनेक गोष्टी शिकवल्या . हजारात पुस्तकं वाचली पण जे पुस्तकात मिळाले नाही ते आईच्या अनुभव गोष्टीतून शिकलो. आजही समाजात वावरताना, नोकरी करतांना आईच्या शब्दांची मला आठवण येते.

माझ्या वाचन लेखनाची मुख्य प्रेरणा आईचं आहे. मला शाळेत तिनेच दाखल केलं. मी आज जे काव्य गीत, विविध विषयांवर लिहितो,बोलतो ना, त्यावेळी आईच्या त्या अनुभवी शब्दांची मला साथ मिळते , मला छान छान गोष्टींची पुस्तक, तेंव्हा ती तीस, चाळीस पैशात मिळायची आणि कधीतरी बाजारात गेली की एखादा पेपर ती घरी आणायची. मला वाचायला सांगायची. तिच सवय मला ही आहे. घरी गावात जाताना आई असे पर्यंत आणि आजही कधीतरी एखाद वर्तमानपत्र घेऊन जातो. गोष्टींची काही पुस्तक विविध जुने अंक अजून पर्यंत गावच्या घरी ठेवले होते.

आई शाळेत तर गेली नव्हतीच पण तिचे वडील त्याकाळी चौथी शिकल्याचे ती अभिमानाने बोलत असे. मोडीतल शिक्षण म्हणायची. मामांच्या कुटुंबाची ,सर्व मामांची प्रगती पाहता त्यांनी केलेले संस्कार आणि माझ्या बाबांच्या आई वडिलांनी केलेले आईवर संस्कार यांचा सुंदर मिलाफ तिच्या वागण्यात ,बोलण्यात राहणीमानात होता. माझ्या आईच स्मरण अखेर पर्यंत उत्तम होत. तिच्या बोलण्यात म्हणी काही उदाहरणे, दाखले असायचे. ती हजरजबाबी होती. परिस्थितीमूळ ती उपेक्षितच राहिली, कौतुक मोठ्यान्च होत गरीबांच नाही. आई बाबांचं भांडण हे माझ्यासाठी कधीतरी मनोरंजन होत. अगदी गंमत यायची ऐकून.

अनेक संस्कार गोष्टी मला आईनं सांगितल्या आहेत. त्यातली मला सांगितलेली "अती शहाणा,नासक्या धना" ही गोष्ट कधीतरी आठवली की मी एकटा असलो तरी हसतो, अंतर्मुख होतो कारण असे "धना " मला अनेकदा भेटले आहेत. जे कधी दुसऱ्याला चांगले मानत नाहीत, समोरचा कितीही चांगले काम करू दे त्याला नाव ठेवणार. माझच कस बरोबरच, हे चूक असूनही छातीठोकपणे सांगणार, तो धना कुणाचे घर कस फोडायचं, कुणाला बदनाम कसं करायच, भांडण कसं लावायच आणि आपण कस सोडवायला जायचं हे त्याच कसब मोठं होत. रस्त्याने सरळ कोण चालत असेल तर त्याला धक्का हा स्वतः मारणार आणि कुणी विचारलं तर हा त्याच्या अंगावर धावणार तू नीट चाल म्हणून. रातोरात दुसऱ्याच्या शेतातल धान्य कापून आणणार आणि सकाळीच हाच त्या मालकाला जावून सांगणार तुला शेताची राखण करता येत नाही का ? धनान उष्टया हाताने कधीच कावळा हाकलून लावला नाही. पण दातृत्व आणि कर्तृत्वाच्या मोठ्या कथा रंगवून सांगणार "कुणाचे भलं होत असेल तर त्याच अमंगल चिंतन करणार रुबाबात बोलणं लबाड वागणं आईच्या भाषेत रूप संतांच, वागणं चोराच, मुद्दामच दुसऱ्याची कळ काढून जास्त अंगलट आलं की बायकोला पुढे करणार, बायको पण बेडर पुरुषांच्या अंगावर धावून जाणारी आणि बायकांच्या झिपऱ्या ओढणारी. दुर्दैव म्हणजे न्याय बैठकीत धनांच भाऊबंदही त्याचीच बाजू घेऊन समोरची सत्य बाजू असत्य असल्याचे पुराव्यातून सिद्ध करण्यात माहिर .न्यायात हार नाही ,अतीच झाल तर बायका पोरं आणून आरडाओरडा करणार, बैठक उधलणार .धनांच्या या कुजकट वागण्यान त्याच्या आयुष्याची अखेर वाईट झाली ."करनी तशी भरनी". हा गोष्टीचा शेवट.

तर त्या गोष्टीतला नासका धना आईन असा काही रंगवून सांगितला की आजही मला वाटत तो गोष्टीतला धना नसून आईनं कुठतरी पाहिलेला ,कुणीतरी सांगितलेला असावा. ती गोष्ट आईन सांगितली आणि मग मला शेवटी उपदेश, असा "धना "तू होऊ नको ,आपण कुणाची निंदा करायची नाही लहान मोठ्याचा आदर करायचा ,दुसऱ्याचा मत्सर करायचा नाही तुझ्या हातून कधी चूक झालीच तर ती कबुल कर, आणि तशी चूक कधी करू नकोस .लोक काय बोलतात ते नीट ऐक. विचार कर मग बोल. इतकी सुंदर अनुभवशील बोध कथा ऐकल्यावर, सांगितल्यावर कोणतं मूल घडणार नाही ? मी आज पन्नाशी ओलांडली तरी कोणत्याही नशेलि पदार्थाचे सेवन केलं नाही, यापुढे करणार नाही, दुसऱ्याला प्रोत्साहन देण्यास मागेपुढे पहात नाही. हस्ते परहस्ते गरजवंताला सहकार्य करतो. त्याचा गवगवा करत नाही . कुणाची निंदा करत नाहीच . आपली कुणी केलीच निंदा तर त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करतो. माझी दोस्ती अनेक लोकांशी आहे पण मित्र हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच.

पाट्यां, ग्रूप बाजी यापासून मी अलिप्त राहतो .कारण तिथं कुणीतरी कुणा बद्दल चेष्टा मस्करी कुणी हजर नसेल त्यांची सुरू असते .मग त्या साक्षी पुराव्यात जातो कोण ?..अकारण वादात गुंतवून विरोधक तुम्हांला तुमच्या ध्येयापासून परावृत करत असतात .आपला चांगला वेळ बरबाद होतो ,आपण त्याच विचारात रहातो .पण नकळत आपणही समोरच्या प्रतीउत्तर देण्याच्या ,धडा शिकविनेचे नादात आपल नुकसान करतो .आईन अश्या अनेक गोष्टी सांगितल्या मी त्या लक्षपूर्वक ऐकल्या त्यामुळं माझ्या काही चांगल्या कामाची कुणी चेष्टा ,निंदा केल्याच मला कळत तेंव्हा मला आईने सांगितलेली" नासक्या धना ,अती शहाणा "गोष्ट आठवते .मग मी अंतर्मुख होतो आणि माझ्या नियोजित कामाला सुरुवात करतो .अनेक आया आपल्या लेकरांना गोष्टीं सांगतात .माझ्या आईच्या अश्या अनेक गोष्टी गप्पातून मी घडलो हे त्रिवार सत्य.



## " स्वातंत्र्यवीर "

श्रीराम धोंडू चिंदरकर,
चिंदर

**देहाकडून देवाकडे जाताना देश लागतो**
**आणि या देशाचे आपण देणे लागतो**


असे थोर विचार ज्यांचे,
कुणी म्हणे स्वातंत्र्यवीर तर कुणी म्हणे वैरी.
भोगली दहा वर्षे अंदमानात शिक्षा,
कारण ते तर फक्त ब्रिटिशांचे वैरी_

झाला 1857ला सैनिकांचा पहिला उठाव,
परंतु म्हटले त्यास सर्वांनी सैनिक विद्रोह.
ते सावरकरच होते ज्यांनी म्हटले,
नव्हता तो सैनिक-विद्रोह, हा तर स्वातंत्र्यसमर.

अरे हिम्मत नव्हती कुणाची,
लिहावयाचे गोऱ्यांच्या विरोधात एक अक्षर.
परंतु वयाच्या 25 व्या वर्षी सावरकरांनी,
लिहिला 1857 चा स्वातंत्र समर.

हाच तो स्वातंत्रवीर ज्याने जाणली होती,
सर्वात आधी ब्रिटिशांची खेळी.
म्हणूनच लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने,
केली विदेशी कपड्यांची होळी.

उभी करत क्रांतिकारी संघटना अभिनव भारत,
इथूनच रचली गेली गोऱ्यांच्या अंताची पारध.
घेत शपथ भारत मातेच्या स्वातंत्र्याची,
केली ब्रिटिश हुकूमशाही गारद.




याच प्रेरणेतून घडला मदनलाल,
पहिला हुतात्मा शिष्य.
घालत गोळ्या कर्जन वायलीला,
केले हुकूमशाहीला लक्ष्य.

पाठवुनी गुप्तपणे हत्यारे,
ज्यांनी क्रांतीवीरांना एकवटले.
त्याच अनंत कान्हेरीं नी,
जुलमी जॅक्सनला यमसदनास पाठवले.

पेटवुनी लाखोंच्या मनात क्रांतीज्योत,
रचली भारत मातेच्या स्वातंत्र्याची नांदी.
करत सगळीकडे सशस्त्र क्रांती,
अनेकजण बनले ब्रिटिशांचे बंदी.

झाल्या ज्यास जन्मठेपेच्या शिक्षा दोन,
असा हा एकमेव क्रांतीवीर.
तरीही अज्ञानी-बुद्धीहीन,_।
म्हणती त्यांस माफीवीर.

कुणी म्हणे दिला माफीनामा,
तर कुणी म्हणे दयेची भिक.
अरे सोसल्या दहा वर्षे नरक यातना,
।नाही कुणी ऐकली त्याची चिख.

नव्हती ती कधीही माफी,
तो फक्त एक लिखित करार.
म्हणूनच तुरुंगात मरण्यापेक्षा,
केला हिंदू, दलितांचा उद्धार.

निसटुनी अंदमानातुन, बनत स्थानबद्ध,
केले अंध श्रद्धेचे दमन.
करत सगळीकडे जात्युच्छेदन,
स्थापन केले मंदिर पतित-पावन.

अहिंसेच्याच मार्गाने मिळाले असते स्वातंत्र्य,
तर महाराजांनीही घेतली नसती हाती तलवार.
तोच आदर्श समोर ठेवत,
केला गोऱ्यांवर पलटवार.

म्हणती जे त्यांना स्वातंत्रवैरी, माफीवीर...
तपासा आधी कर्तृत्व स्वतःचे, काय मारला आपण तीर.
कर्तुत्व स्वतःचे शून्य तरी म्हणती त्यांस माफीवीर
कारण कळलाच नाही आणि कळणारही नाही असा हा भारत मातेचा " स्वातंत्र्यवीर "

# वाघ आणि गुराखी

एका घनदाट जंगलात एक तरुण गुराखी राहायचा. तो रोज सकाळी आपल्या गुरांना चारण्यासाठी जंगलात घेऊन जायचा आणि संध्याकाळी परत आणायचा. त्याचे जीवन शांत आणि सुखी होते.

एके दिवशी, गुराख्याने आपल्या मित्रांशी थोडी मस्करी करायचे ठरवले. त्याने जोरजोरात ओरडायला सुरुवात केली, "वाघ आला! वाघ आला! मला वाचवा!" त्याचे मित्र त्याच्या आवाजावर धावत आले, पण त्यांनी पाहिले तर तिथे कुठलाही वाघ नव्हता. गुराखी हसत म्हणाला, "मी फक्त मस्करी केली होती."



त्या दिवशीच्या मस्करीने गुराखी खूप खुश झाला. त्याने पुन्हा तेच केले. दुसऱ्या दिवशी "वाघ आला! वाघ आला!" तो ओरडला, आणि त्याचे मित्र पुन्हा धावत आले. पण या वेळेसही तिथे कुठलाही वाघ नव्हता. मित्रांनी गुराख्याला समज दिली, पण त्याच्या खोटेपणाने ते खूप नाराज झाले.

तिसऱ्या दिवशी, गुराखी खरोखरच एका मोठ्या वाघाच्या समोर आला. त्याने घाबरून ओरडायला सुरुवात केली, "वाघ आला! वाघ आला! मला वाचवा!" पण यावेळी त्याचे मित्र आले नाहीत. त्यांना वाटले की गुराखी पुन्हा मस्करी करत आहे.

वाघाने गुराख्यावर हल्ला केला, पण नशीबाने गुराख्याने कसाबसा स्वत:चा जीव वाचवला आणि घरी पोहोचला. त्याने आपल्या मित्रांना संपूर्ण गोष्ट सांगितली आणि आपली चूक मान्य केली. त्याने खोटं बोलून मस्करी केल्याने किती मोठं संकट ओढवलं हे त्याला समजलं.

त्या दिवसा पासून गुराख्याने कधीही खोटं बोलण्याचं ठरवलं. या घटनेने त्याच्या मित्रांमध्ये त्याचा विश्वास पुन्हा वाढवला आणि त्यांनी पुन्हा एकमेकांवर विश्वास ठेवायला सुरुवात केली.

**कथेचा नैतिक:** खोटं बोलून मस्करी करणे आपल्यासाठी आणि इतरांसाठी धोकादायक ठरू शकते. नेहमीच सत्य बोलावे आणि एकमेकांवर विश्वास ठेवावा.

**श्री.विलास जोशी ,**
**कोल्हापूर**

# शाळेची तयारी

मे महिन्याची उन्हाळी सुट्टी कशी संपली ते काही कळले नाही. उन्हाळी सुट्टीत खूप मजा आली. खूप ठिकाणी मला फिरायला मिळाले. मला उन्हाळी सुट्टी खूप आवडते. असं वाटलं की उन्हाळी सुट्टी कधी संपूच नये. मज्जा मस्ती मध्ये कसा दिवस जातो ते काही कळतच नाही. असेच उन्हाळी सुट्टीचे सर्व दिवस संपू लागले आणि शाळेत जाण्याचा दिवस जवळ येऊ लागला. मला ही उन्हाळी सुट्टी खूप आवडली.शाळेत जाण्याचा दिवस जवळ येऊ लागला शाळेत नवीन वर्गात जायचं म्हणजे सर्व शाळेच्या वस्तू नवीन घ्याव्या लागणारच म्हणून मग आता शाळेत जाण्याची तयारी करायची. नवीन दप्तर,नवीन पुस्तके,नवीन छत्री-रेनकोट, नवीन कपडे, नवीन चप्पल सर्वच काही नवीन पण ज्यांच्याकडे हे सगळं घेण्यासाठी पैसे असतील तर ती माणसं या सर्व वस्तू घेतील पण जे गरीब असतील त्यांच्याकडे पैसे नसतील ती माणसं त्यांच्या मुलांना या वस्तू देऊ शकत नाही.

पण नवीन वस्तू मिळाल्या म्हणजे अभ्यास येत नाही. त्यासाठी आपण खूप वाचलं,लिहिलं पाहिजे अभ्यास केला पाहिजे. मग या नवीन वस्तूंचा काय उपयोग जुन्या वस्तू असल्या तरी पुष्कळ.अनेक ठिकाणी तर काही मुलांकडे शाळेत नेण्यासाठी दप्तर सुद्धा नसते ती मुले हातातच पुस्तके नेतात. ज्यांच्याकडे पैसे असतात त्यांची मुले नवीन वस्तू घेतात आणि जुन्या वस्तू फेकून देतात मग जर त्या जुन्या वस्तू फेकून देण्याऐवजी कुठल्या तरी गरीब गरजू मुलांना दिल्या तर खूप चांगलं होईल.

मग ती मुले सुद्धा शाळेत जाताना आनंदात जातील.आणि आपल्याला पण गरजू मुलांना मदत केल्याचे समाधान मिळेल.

**कु.पुर्वा सचिन जगदाळे**



# "रंगीबेरंगी फुलपाखरू"

**सुजाता तेली,**
**कणकवली**

एके दिवशी, छोट्या रोहनला शाळेतून घरी येताना एक रंगीबेरंगी फुलपाखरू दिसलं. त्याचं नाव होतं पिंकी. पिंकीच्या पंखांवर लाल, पिवळे, निळे, आणि हिरवे रंग होते. रोहनने कधीच असं सुंदर फुलपाखरू पाहिलं नव्हतं.

रोहनने पिंकीला विचारलं, "पिंकी, तू इतकी सुंदर कशी झालीस?"
पिंकीने हसत उत्तर दिलं, "माझं सौंदर्य निसर्गाने दिलं आहे. पण, खरं सौंदर्य हे आपल्या कामात असतं."
रोहनला आश्चर्य वाटलं, "काय कामं करतेस तू?"
पिंकीने सांगितलं, "मी फुलांमधून मध गोळा करून मधमाशांना मदत करते. आणि फुलांना परागीकरण करून नवीन फुलं उमलायला मदत करते."
रोहनला आता पिंकीचं काम खूप महत्त्वाचं वाटायला लागलं. त्याने पिंकीला विचारलं, "मी तुझी काही मदत करू शकतो का?"
पिंकीने उत्तर दिलं, "हो, तू झाडं लावू शकतोस आणि फुलं फुलवू शकतोस. त्यामुळे आमचं काम सोपं होतं."
रोहनने ठरवलं की तो आपल्या बागेत नवीन फुलं लावणार. त्याने आई-बाबांना सांगितलं आणि सर्वांनी मिळून बागेत फुलं लावायला सुरुवात केली.
काही दिवसांनी, बागेत सुंदर फुलं फुलली. पिंकी आणि तिच्या मित्रांनी त्या फुलांमध्ये खेळायला सुरुवात केली. रोहनला खूप आनंद झाला. त्याने निसर्गाच्या या सौंदर्याचा आनंद घेतला.
त्या दिवसापासून, रोहन नेहमीच पर्यावरणाची काळजी घेतो आणि नवीन झाडं लावतो. पिंकी आणि रोहनची मैत्रीही खूप घट्ट झाली.

**कथेचा नैतिक:** निसर्गाची काळजी घेणं हे आपलं कर्तव्य आहे. झाडं लावा, फुलं फुलवा आणि पर्यावरणाचं रक्षण करा.

## "आपले पर्यावरण"

निसर्गाचे सौंदर्य,
जगात अप्रतिम आहे,
पृथ्वीच्या या सानिध्यात,
जीवनाची गाणी आहे

झाडांच्या त्या सावलीत,
थंडावा अनमोल आहे,
वृक्ष वेलींच्या साथीने,
हवा शुद्धतेने आहे.

नद्या-नाले गातात,
आपले सुरेख गीत,
पक्ष्यांच्या त्या गाण्यात,
सजतात स्वप्नांचे मीत.

प्राणी, पक्षी, फुलपाखरे,
सर्वांना प्रेम द्यावे,
आपल्या या पर्यावरणास,
सतत जपून ठेवावे.

पृथ्वीचा हा हिरवा शाल,
सांभाळायला हवा,
पर्यावरणाची सजीवता,
सर्वांनी लक्षात घ्यायला हवी.

स्वच्छता, वृक्षारोपण,
आपले कर्तव्य ठरावे,
निसर्गमातेची काळजी,
आपण सर्वांनी घ्यावी.

पृथ्वीला सुंदर बनवू,
सर्वांचा प्रयत्न असावा,
पर्यावरणाचे रक्षण,
आपल्या हातात असावे.

**निला तावडे**
**आडेली वेंगुर्ला**

## "आकाशातील चांदोबा"

आकाशातील चांदोबा,
सोन्यासारखा झळकतो,
रात्रीच्या त्या शांत वेळी,
नभी झगमगतो.

ताऱ्यांच्या त्या संगतीत,
तो आहे एकटा,
आणि आम्हाला झोपवायला,
तो येतो रात्री निघता.

चांदण्या रात्र दिसे सुंदर,
त्याच्या मंद प्रकाशात,
मुलांना त्याच्या गोष्टी,
जणू गाण्यातल्या तालात.

आई म्हणते चांदोबाला,
"माझ्या बाळाला झोपू दे,"
तो हसून म्हणतो
, "हो आई, मुलांना सुखाची झोप दे."

रोज रात्रीची भेट आपली,
चांदोबा, तू विसरू नकोस,
तुझ्या सोबतीने आम्ही सगळे,
स्वप्नांच्या दुनियेत निघू नकोस.

स्वप्नांमध्ये जाऊ आपण,
चांदण्यांच्या त्या गावी,
तिथे आनंद सापडावा,
आणि सुखांची बरसात व्हावी.
चांदोबा, चांदोबा, तू आहेस सर्वांचा प्रिय,
तुझ्या प्रकाशात आम्हाला, मिळतो आनंद खरा.

**मिहीर काळे वाठार**
**कोल्हापूर**

